हॅलो प्रभात

# ‘विवेकानंद’च्या कविन केंगनाळकर पॅरा-शूटिंगस्पर्धेत यश




कोल्हापूर : हॅलो प्रभात

विवेकानंद कॉलेज इयत्ता ११ वी चा विद्यार्थी कविन केंगनाळकर याने अल ऐन (यूएई) येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय पॅरा-शूटिंग स्पर्धेत १० मीटर एअर रायफल सांघिक गटात पहिले पदक जिंकून कोल्हापूर आणि भारताचा गौरव वाढवला आहे.

कविनच्या यशामागे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, तसेच प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार, जिमखाना प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रशिक्षक जीवन राय आणि जयप्रकाश नौटियाल यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ कोल्हापूर, मंगळवार, ४ नोव्हेंबर २०२५

# 'सीए' परीक्षेत कोल्हापूर विभागात आसिम प्रथम

## ३४ विद्यार्थी यशस्वी ; अन्य पूर्व परीक्षांमध्ये १२६ जण उत्तीर्ण

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३ : चार्टर्ड अकाउंटंट्स् (सीए)च्या अंतिम परीक्षेचा निकाल आज आयसीएआय (दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट ऑफ इंडिया)ने आज जाहीर केला. त्यात कोल्हापूरमधील ३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. कोल्हापूर विभागामधून आसिम मेमन याने प्रथम क्रमांक पटकविला. अभिमान माळी दुसरा, ऋतुराज दाबाडे तिसरा, तर सुष्मिता काटकर चौथी आली.

दरम्यान, देशातून मध्य प्रदेशमधील धामनोद येथील मुकुंद आगीवाल याने अंतिम परीक्षेत प्रथम क्रमांक पटकाविला आहे. हैदराबादमधील तेजस मुंदडा याने द्वितीय आणि राजस्थानातील अलवर येथील बकुल गुप्ता तृतीय आला.

'आयसीएआय'तर्फे सप्टेंबरमध्ये झालेल्या परीक्षा कोल्हापूरमधील २४९ विद्यार्थ्यांनी दिली. त्यातील ३४ जण यशस्वी झाले. त्यामध्ये चैत्रा मुजुमदार, श्रीकांत महाजन, आकांक्षा पाटील, प्रथमेश गोगवेकर, ऋषिकेश पोवार, नमिता गाडवे, पूनम उपाध्ये, रसिका पाटील, अपूर्व हजारे, दर्शनी तोडकर, साक्षी झंवर, दिगंबर पाटील, जान्हवी करमरकर, ओंकार सामंत, आदित्य काजरेकर, राजकुमार मसवडे, श्यामसुंदर मालू, श्रुती गाट,

पान ७ वर >



कोल्हापूर : सीए अंतिम परीक्षेत यशस्वी झालेल्या आसिम मेमन याचे सोमवारी पेढा भरवून कौतुक करताना काका मसुद मेमन. शेजारी आजी खैरुनिसा.

# 'सीए' परीक्षेत कोल्हापूर विभागात आसिम प्रथम

> पान १ वरून

मानसी कर्पट्टी, ज्योतिबा पाटील, यश पाटील, प्रियांका सावंत, ईशा गाटे, जान्हवी पावसकर, संजना दरयानी, मिथ गांधी, सूरज पाटील, तुषार घराळ, बिपाशा शेख, पूजा लटकन यांचा समावेश आहे. इंटरमेडिएट परीक्षेमध्ये कोल्हापूर विभागातून ५६४ विद्यार्थ्यांपैकी ७५ विद्यार्थी, तर फाउंडेशन परीक्षेमध्ये ३५७ विद्यार्थ्यांपैकी ५१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. दरम्यान, या परीक्षांतील यशस्वी विद्यार्थ्यांवर नातेवाईक, मित्रमंडळींकडून शुभेच्छांचा वर्षाव झाला. काहींनी गुलालाची उधळण, फटाक्यांची आतषबाजी करत आनंदोत्सव साजरा केला.

**रसायनशास्त्रामुळे विज्ञान नाकारले अन् 'सीए' झालो**



**अभिमान माळी**



**ऋतुराज दाबाडे**



**सुष्मिता काटकर**

दहावीत असताना डॉक्टर बनायचे ठरविले, मात्र, रसायनशास्त्र आवडत नसल्याने विज्ञान शाखा नाकारून अकरावी वाणिज्य शाखेला प्रवेश घेतला. पुढे काका, आजी आणि कुटुंबीयांच्या इच्छेनुसार सीए व्हायचे म्हणून जिद्दीने तयारी केली आणि त्यात यशस्वी झाल्याचे आसिम मेमन याने सांगितले. तो म्हणाला, "मी सध्या शाहूपुरी परिसरात राहत असून मी मूळचा मालवणचा आहे. तेथे आमचा सुपर बझार आहे. मोठ्या भावाचा कोल्हापुरात हॉटेल व्यवसाय आहे. येथील छत्रपती शाहू विद्यालयात आठवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण घेतले. दहावीत साठ गुण मिळाले. त्यावेळी डॉक्टर बनायचे स्वप्न होते. मात्र, कुटुंबीयांच्या इच्छेनुसार विवेकानंद महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला. पुढे ९१ टक्क्यांसह बारावी उत्तीर्ण झालो आणि 'सीए'ची तयारी सुरू केली. बी. कॉम. पूर्ण केले. दररोज आठ ते दहा तास अभ्यास करत होतो. त्या जोरावर आणि कुटुंबीयांच्या पाठबळावर सीए परीक्षेत यशस्वी झालो. विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी अभ्यासात सातत्य ठेवावे." दरम्यान, विभागात द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या अभिमान याने देखील बारावीनंतर सीए होण्याचा निर्धार केला. गेली साडेतीन वर्षे त्याने जिद्दीला अभ्यासातील सातत्याची जोड देत यश मिळविले आहे.

> काठिण्य पातळी अधिक असलेल्या सीए परीक्षेत कोल्हापूर विभागातील ३४ विद्यार्थ्यांनी यश मिळविण्याचा क्षण अभिमानाचा आहे. गेल्या तीन वर्षांत कोल्हापूरमधून दोनशेहून अधिक विद्यार्थी सीए झाले आहेत. सीए क्षेत्रातील या नव्या पिढीमुळे कोल्हापूरच्या प्रगतीला निश्चितच गती मिळेल.
>
> **- नितीन हरगुडे, अध्यक्ष,**
> **आयसीएआय शाखा कोल्हापूर**

तरुण भारत संवाद
मंगळवार, ४ नोव्हेंबर २०२५

# विवेकानंदमध्ये विधान परिषद शिक्षक मतदार नोंदणी

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात आमुलाग्र बदल घडवण्यामध्ये शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. बापूजींच्या विचारांचा वसा आणि वारसा लाभलेल्या कौस्तुभ गावडे यांना विधान परिषदेत शिक्षक आमदार म्हणून विजयी करण्यासाठी जीवाचे रान करू, अशी ग्वाही कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे यांनी दिली. पुणे विभाग शिक्षक मतदार नोंदणीसाठी विवेकानंद कॉलेजमधील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे आयोजित शिक्षकांच्या सहविचार सभेत प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष, प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. या काळात जास्तीत जास्त शिक्षक मतदार नोंदणी करावी, असे आवाहन केले.

सहविचार सभेमध्ये पुणे विभाग शिक्षक मतदार नोंदणीचे जिल्हाप्रमुख भूपाल कुंभार यांनी जिल्ह्यात झालेल्या एकूण शिक्षक मतदार नोंदणीचा आढावा घेतला. पुणे विभाग शिक्षक मतदार संघाचे अधिकृत उमेदवार कौस्तुभ गावडे यांनी जुनी पेन्शन योजना, संचमान्यता, टप्पा अनुदान, पवित्र प्रणाली, शिक्षक पात्रता परीक्षा सक्ती न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहोत, असे आश्वासन दिले. सभेस कोल्हापूर जिल्ह्यातील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे आजी–माजी पदाधिकारी, आजीव सेवक, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते.




**कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित विधान परिषद पुणे विभाग शिक्षक मतदार नोंदणी सहविचार सभेत बोलताना श्रीराम साळुंखे.**